**प्रपत्र - अ**

**नाशिक विभागातील नाशिक, जळगांव, नंदूरबार व अहमदनगर या जिल्हयातील महामंडळाने मागणी केलेल्या प्रस्तावित जमिनीची प्रलंबित असलेल्या प्रकरणांची जिल्हावार यादी.**

**दिनांक : २ जानेवारी, २०१२**

| अ.क्र. | प्रकल्पाचे ठिकाण, तालुका व जिल्हा | प्रस्तावाचा दिनांक | स.नं./ गट नं. | एकूण क्षेत्र चौ.मी. | सद्यस्थिती |
|---|---|---|---|---|---|
| १. | **जिल्हा - अहमदनगर**<br>मौजे मुरशेत,<br>ता. अकोले | १६/०८/१९९९ | १६९,१७१ व १७२ | ६४००० | शासकीय जमिनीचा प्रस्ताव सचिव, गृह (पर्यटन) विभागास पाठविण्यात येऊन सदर जमीन सा.बां. विभागाची असल्याने तसा प्रस्ताव शासन स्तरावरुन सदर विभागाकडे पाठविण्यात यावा असे कळविण्यात आले. या प्रकरणी कक्ष अधिकारी, सा.बां. विभाग, मंत्रालय यांनी त्यांचे कार्यालयीन पत्र दि. १/९/१९९९ अन्वये अ.अ. सा.बां. विभाग, अहमदनगर यांचेकडून सविस्तर तपशिल नकाशासह व अभिप्रायासह शासनास सादर करण्याबाबत कळविले आहे.<br>पुढे दि. २३/४/२००१ चे पत्रान्वये जमीन हस्तांतरीत करणेबाबतचा प्रस्ताव जिल्हाधिकारी, अहमदनगर यांचेकडेही पाठविला आहे. जमीन सा.बां. विभागाची असल्याने त्यांचे स्तरीय सविसतर चौकशी झाल्यानंतर सदर जमीन महसूल विभागाकडे प्रत्यार्पित करण्यास सा.बां. विभागाने सहमती दर्शवून या प्रकरणी कार्यवाही प्रलंबित |

| अ.क्र. | प्रकल्पाचे ठिकाण, तालुका व जिल्हा | प्रस्तावाचा दिनांक | स.नं./ गट नं. | एकूण क्षेत्र चौ.मी. | सद्यस्थिती |
|---|---|---|---|---|---|
| | | | | | नसल्याने पुढील निर्णय महसूल व वन विभागाने घ्यावयाचा आहे असे दि. २१/७/२००५ चे पत्रान्वये महामंडळास कळविले आहे. त्यानुसार महामंडळाने दि. १८/८/२००५ चे पत्रान्वये जागेची मागणी प्र.स. महसूल व वनविभाग यांचेकडे केली आहे. उपविभागीय अधिकारी, संगमनेर यांचे स्तरीय चौकशीकरीता प्रलंबित आहे. याबाबत पाठपुरावा सुरु आहे. प्रकरण उपविभागीय अधिकारी, संगमनेर यांचेकडे प्रलंबित आहे |
| २. | मौजे कोपरगाव, ता. कोपरगाव | १०/३/२०१० | कोपरगाव नगरपालिका हद्दीत महामार्गालगत | २००० | जमिन प्रारुप विकास योजना, कोपरगाव नगरपालिका हद्दीत अभ्यागत केंद्रासाठी महामार्गालगत जागा आरक्षित ठेवणेबाबतचा प्रस्ताव सहा. संचालक आणि मूल्य निर्धारण विभाग, नाशिक यांस पाठविण्यात आला आहे. त्याची प्रत जिल्हाधिकारी, नाशिक यांस पाठविली आहे. याबाबत पाठपुरावा सुरु आहे. प्रकरण सदर विभागाकडे प्रलंबित आहे. |
| ३. | मौजे भंडारदरा, ता. अकोले | ३/२/२०१० | ४६/४ | ४०० | जिल्हा परिषदेचे विश्रामगृह वर्ग करणेबाबतचा प्रस्ताव मुख्याधिकारी, जिल्हा परिषद, अहमदनगर यांस पाठविला आहे. त्याची प्रत जिल्हाधिकारी, अहमदनगर यांस पाठविण्यात आली आहे. याबाबत दि. २/६/२०१० रोजी शेवटचे स्मरणपत्र पाठविले आहे. प्रकरणी उपसचिव (पर्यटन) यांनाही शासन स्तरावरुन पाठपुरावा करणेबाबत |

| अ.क्र. | प्रकल्पाचे ठिकाण, तालुका व जिल्हा | प्रस्तावाचा दिनांक | स.नं./ गट नं. | एकूण क्षेत्र चौ.मी. | सद्यस्थिती |
|---|---|---|---|---|---|
| | | | | | कळविण्यात आले आहे. प्रकरण जिल्हा परिषद, अहमदनगर यांचेकडे प्रलंबित आहे. |
| ४. | मौजे मुरशेत, ता. अकोले | २२/४/२००९ | १,२,३,१५,२१ ते ३६, ४५,५६,५९,६०,६२, ६८, ७३,७५ ते ७७ १०० ते १०३, १०७, १०९,११०,१११,११३, ११४,११५, १२५,१२७ ते १३१, १५०, १५१, १५९,१७० ते १७३ | १०० एकर | टुरिस्ट हब प्रकल्पाचे बांधकामासाठी पर्यटन खाते, भारत सरकारकडून निधी उपलब्ध झाला असल्याने सदर प्रकल्पासाठी सरकारी जमीन उपलब्ध करुन देणेबाबतचा प्रस्ताव जिल्हा नियोजन अधिकारी, अहमदनगर यांना पाठविला आहे. याबाबत पाठपुरावा सुरु आहे. प्रकरण त्यांचेकडे प्रलंबित आहे. |
| ५. | मौजे उदावणे, ता. अकोले | २२/४/२००९ | १ | ३.५ एकर | टुरिस्ट हब प्रकल्पाचे बांधकामासाठी पर्यटन खाते, भारत सरकारकडून निधी उपलब्ध झाला असल्याने सदर प्रकल्पासाठी सरकारी जमीन उपलब्ध करुन देणेबाबतचा प्रस्ताव जिल्हा नियोजन अधिकारी, अहमदनगर यांना पाठविला आहे. याबाबत पाठपुरावा सुरु आहे. प्रकरण त्यांचेकडे प्रलंबित आहे. |

**<u>प्रपत्र - ब</u>**

**नाशिक विभागातील नाशिक, जळगांव, नंदूरबार व अहमदनगर या जिल्हयातील महामंडळाचे ताब्यात असलेल्या जमिनीची प्रलंबित प्रकरणांची जिल्हावार यादी.**

**<u>दिनांक : २ जानेवारी, २०१२</u>**

| अ.क्र. | प्रकल्पाचे ठिकाण, तालुका व जिल्हा | ताब्या घेतल्याचा दिनांक | स.नं./ गट नं. | एकूण क्षेत्र चौ.मी. | सद्यस्थिती |
|---|---|---|---|---|---|
| १. | **जिल्हा - अहमदनगर**<br>मौजे शिर्डी,<br>ता. कोपरगांव | १४/५/१९९७ | १/१ अ१/ २ब/३ | ४९० | जमिनीवरील वैद्य समाजाच्या लोकांचे अतिक्रमण काढुन टाकणेबाबत श्री. विजयकुमार, जिल्हाधिकारी, अहमदनगर यांना अ.शा. पत्रान्वये कळविणेत आले आहे. याबाबत दिवाणी न्यायालय (व.स्तर) कोपरगाव यांचेकडे सदर वैद्य समाजातर्फे दिवाणी दावा क्र. २३/१९८९ दाखल करण्यात आला होता तो दि. ३१/१०/१९९१ ला फेटाळण्यात आला. त्यावर त्यांनी जिल्हा न्यायालय, अहमदनगर येथे अपील क्र. ५२/९२ केले होते ते सुध्दा दि. २६/३/१९८९ रोजी फेटाळण्यात आले. सदर बाब जिल्हाधिकारी यांचे निदर्शनास लेखी स्वरुपात आणून देण्यांत आली. तसेच याबाबत अद्याप पर्यंत सातत्याने पाठपुरावा सुरु आहे. प्रकरण जिल्हाधिकारी, अहमदनगर यांचे कार्यालयाकडे प्रलंबित आहे. |
| २ | मौजे भंडारदरा,<br>ता. अकोले | २०/१/१९७५ | ४८/१,४८/अ ३८(पै) व ४६-अ | १४६०० | सदर जमीनीवर पर्यटक निवास असून सदर जमीन व त्यावरील मालमत्ता भाग-भांडवल स्वरुपात महामंडळाकडे हस्तांतरीत झाली आहे. सदर जमीन महामंडळाचे नावे दाखल करुन घेणेबाबत गेल्या कित्येक वर्षापासून सातत्याने प्रयत्न सुरु आहेत. त्यासाठी सदर जमीनीची मोजणी करुन |

| अ.क्र. | प्रकल्पाचे ठिकाण, तालुका व जिल्हा | ताब्या घेतल्याचा दिनांक | स.नं./ गट नं. | एकूण क्षेत्र चौ.मी. | सद्यस्थिती |
|---|---|---|---|---|---|
| | | | | | घेण्यात आली आहे. झालेल्या मोजणीनुसार प्रत्यक्षात महामंडळाचे वहिवाटीखाली असलेली जमीन नावे दाखल करुन देणेबाबत जिल्हाधिकारी, अहमदनगर यांचे कार्यालयाशी सातत्याने पाठपुरावा सुरु आहे. याबाबत महामंडळाकडे मागणी केलेल्या आवश्यक त्या कागदपत्रांची पूर्तता करण्यात आली आहे. प्रकरण जिल्हाधिकारी कार्यालयाकडे प्रलंबित आहे. |

**<u>प्रपत्र - ब</u>**

**<u>महामंडळाकडे ताब्यात/वर्ग झालेल्या जमिनीची ७/१२ उता-यात अद्याप नोंद दाखल झालेली नसल्याची जमिनीची यादी.</u>**

| अ.क | ठिकाण | स.नं./गट नं./ न.भू.क्र. | क्षेत्र चौ.मी. | भागभांडवल/शासकीय/खाजगी संपादित |
|---|---|---|---|---|
| १. | **जिल्हा - अहमदनगर**<br>मौ .मूरशेत (भंडारदरा)<br>ता.अकोले | ३८,४६/अ, ४८/अ<br>४८/ब | १४६०० | भागभांडवल |